## वाढदिवस शुभेच्छा




**धीरेंद्र पुरभे**
तालुका सघटक,
शिवसेना, धरणगाव

**मान्यवरांच्या वाढदिवसापूर्वी एक दिवस आधी हितचिंतकांनी खालील ई-मेल आयडीवर संपूर्ण नाव छायाचित्रासह माहिती पाठवावी.**
deshdootmidc@gmail.com

## थोडक्यात...



### गणपती नगरातील महादेव मंदिरात महाआरती

**जळगाव ।** पिंप्राळा परिसरातील गणपती नगरमधील महादेव मंदिरात महाशिवरात्री निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी पहाटेपासून भाविक भक्तांकडून मंदिरात जलाभिषेक करण्यात आला. तसेच सर्व भाविक भक्तांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली होती. त्यानंतर मनोभावेपूजा अर्चा करून महादेवांचे दर्शन घेण्यासाठी दिवसभर भाविकांची गर्दी सुरु होती. यावेळी दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांना साबुदाना फराळ व राजगिरा लाडूचे वाटप करण्यात येत होते. महिला मंडळाने पूजा अर्चा झाल्यानंतर भजन गायन केले. सायंकाळी महादेव पार्वतीची मिरवणूक काढण्यात आली. तसेच महादेवाच्या शिवलींगसह मंदिराला फुलांनी सजविण्यात आले असून मंदिरावर आकर्षक लाईटींग टाकण्यात आली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व गणपतीनगरातील रहिवाश्यांनी सहकार्य केले.

### तेली समाजाचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय चौधरी यांचा भाजपात प्रवेश



**जळगाव ।** प्रदेश तेली महासंघाचे जिल्हाअध्यक्ष तथा तंटामुक्तीचे जिल्हा कार्याध्यक्ष तसेच तेली समाज युवक मंडळाचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय तुकाराम चौधरी व मधुकर किसन देवरे यांनी प्रदेशाध्यक्ष ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्तेसह भाजपात प्रवेश केला. यावेळी प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, ना. गिरीश महाजन, भाजपा प्रदेश महामंत्री विजय चौधरी, केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे, खासदार स्मिताताई वाघ, आमदार राजूमामा भोळे उपस्थित होते. यावेळी दत्तात्रय चौधरी यांनी आगामी महापालिका निवडणुकीसाठी जळगाव शहरात भाजपाचा विचार प्रत्येक घराघरापर्यंत पोहचविण्याचा मानस व्यक्त केलेला आहे.



# महाशिवरात्री

ॐ नमः शिवाय

**जळगाव । संपूर्ण शहरात महाशिवरात्री उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. सकाळपासूनच विविध शिवमंदिरांत भक्तांची मोठी गर्दी दिसून आली. विशेषतः ओंकारेश्वर मंदिरात भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली आणि भगवान शिवाच्या दर्शनाचा लाभ घेतला. संपूर्ण शहर शिवमय झाले होते.**

## ओंकारेश्वर मंदिरासह शहरातील विविध शिव मंदिरांमध्ये भाविकांची अलोट गर्दी; बम बम भोलेंचा जय जयकार

महाशिवरात्री निमित्त ओंकारेश्वर मंदिरात भाविकांची अलोट गर्दी उसळली होती. पहाटेपासूनच मंदिरात दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. 'हर हर महादेव' आणि 'बोल बम'च्या जयघोषात वातावरण दुमदुमून गेले. देवस्थान समितीने भाविकांसाठी महिला व पुरूषांसाठी दर्शनासाठी विशेष व्यवस्था केली होती,

**मंदिर परिसरात यात्रोत्सव**

महाशिवरात्रीनिमीत्त मंदिर परिसरात यात्रोत्सव भरवण्यात आला होता, ज्यात विविध धार्मिक वस्तू, प्रसाद व अन्य पूजेच्या साहित्याची दुकाने थाटण्यात आली होती. श्रद्धाळूंनी या यात्रोत्सवात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते, जसे की भजन, कीर्तन, प्रवचन इत्यादी, ज्यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.

**महाभिषेक, महाप्रसाद**

महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर पहाटे शिवलिंगावर विशेष महाभिषेक करण्यात आला. दुग्धाभिषेक, जलाभिषेक, पंचामृत अभिषेक, बेलपत्र अर्पण आदी विधींपूर्वक पूजा करण्यात आली. मंदिर प्रशासनाने भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते. भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

**दर्शनासाठी रात्री उशीरापर्यंत रांगा**

महाशिवरात्रीच्या दिवशी भगवान शिवाचे



रात्रभर जागरण करणे महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे मंदिरात भाविकांची गर्दी रात्री उशीरापर्यंत कायम होती. अनेकांनी रात्रभर जागरण करून भगवान शंकराच्या आराधनेत वेळ घालवला.

**शिवमंदिरांत धार्मिक कार्यक्रम**

ओंकारेश्वर मंदिरासह शहरातील इतर शिवमंदिरांतही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मंदिरांमध्ये भजन, कीर्तन आणि प्रवचनांचे विशेष सत्र घेण्यात आले. अनेक ठिकाणी जलाभिषेक आणि रुद्राभिषेकही करण्यात आला.

**ठिकठिकाणी फराळ वाटप**

महाशिवरात्रीच्या उपासनासाठी शहरभर विविध ठिकाणी मोफत फराळ वाटप करण्यात आले. अनेक सामाजिक आणि धार्मिक संस्थांनी उपवासासाठी शिवभक्तांना मंदिरांमध्ये साबुदाणा खिचडी, भगर, शेंगदाण्याच्या लाडू आदी पदार्थांचे वाटप केले.



## प्रशांत कोरटकर यास अटक करण्याची संभाजी ब्रिगेडची मागणी



**जळगाव । प्रतिनिधी**

येथील संभाजी ब्रिगेडच्या वतीने महापुरूषांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या तसेच इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना धमकवणाऱ्या विकृत प्रशांत कोरटकरला अटक करण्यासंदर्भात पोलीस अधीक्षक कार्यालय जळगाव येथे निवेदन देण्यात आले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, काल मध्यरात्री इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना प्रशांत कोरटकर नावाच्या विकृत व्यक्तीने कॉल करून धमकवण्याचा प्रयत्न केला. या कॉलदरम्यान सडक्या मानसिकता असलेल्या कोरटकरने महापुरूषांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करून शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना शिव्या देऊन जीवे मारण्याची धमकी दिली आहे. कोरटकरने भारतीय संविधानाद्वारे स्थापित लोकशाही राज्याच्या संकल्पनेची पायमल्ली केली आहे. या कॉल रेकॉर्डिंगद्वारे कोरटकरने त्याच्या विकृत संस्कारांचा परिचय दिला आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. या विकृत मानसिकता असलेल्या माणसाला तातडीने अटक करून कठोर शासन करण्यात यावे, या आशयाचे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस उपअधीक्षक संदीप गावीत यांना दिले. याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष तुषार सावंत, महानगर अध्यक्ष संदीप पाटील, मयूर चौधरी, लक्ष्मणराव पाटील, गणेश पाटील, रविंद्र पाटील यांच्यासह भरत पाटील, चंद्रकांत पाटील, राकेश कोठारी, अविनाश पाटील आदी उपस्थित होते.

## शहरातील विविध भागांतून बुलेट चोरणाऱ्या दोन जणांना अटक

### एमआयडीसी पोलिसांची कारवाई; दोन बुलेट जप्त ; संशयितांची कबुली

**जळगाव । प्रतिनिधी**

शहरातील मास्टर कॉलनी आणि सिंधी कॉलनी परिसर अश्या वेगवेगळ्या भागातून दोन बुलेट मोटारसायकल चोरीचा गुन्ह्यांची उकल एमआयडीसी पोलीसांनी केली आहे. यात दोन चोरट्यांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून चोरी केलेल्या दोन बुलेट मोटारसायकल जप्त करण्यात आले आहे.

अधिक माहिती अशी की, जळगाव शहरातील सिंधी कॉलनी येथील बाबा कॉलनीतून १३ नोंव्हेबर रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास हर्षद दिलीपकुमार नाकपाल यांच्या मालकीची बुलेट (क्रमांक एमएच-१९ सीएच४८९८) त्यांच्या राहत्या घरासमोरून चोरी झाली होती. या प्रकरणी नाकपाल यांनी एमआयडीसी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली होती. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यावर पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी गुन्हे शोध पथकातील तपासी अंमलदार पोना किशोर पाटील यांना सदर भागातील सीसीटीव्ही फुटेज तपासून गुन्हा उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे शोध पथकातील पोना. योगेश बारी, विकास सातदीवे, पोका नाना तायडे, किरण पाटील, राहुल घेटे यांनी गोपनीय बातमीच्या आधारे संशयित जावेद शेख चांद, रा. मास्टर कॉलनी, अदनान अमजद खान रा. शाहुनगर जळगाव यांना अटक केली. दोघांना न्यायालयात हजर केले असता त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली. पोलिस कोठडीत असताना दोन्ही संशयितांनी बुलेट क्र. एमएच-१९ सीएच ४८९८ ही सिंधी कॉलनी बाबा नगर येथून चोरी केल्याची कबुली दिली. रिमांड दरम्यान त्याने पुन्हा एक काळ्या रंगाची बुलेट ही मास्टर कॉलनी परिसरातून चोरी केल्याची कबुली दिल्याने बुलेट सुद्धा त्याच्याकडून हस्तगत करण्यात आलेली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप पाटील, पोउपनि राहुल तायडे, चंद्रकांत धनके, पोहेका गणेश शिरसाळे, पोना किशोर पाटील, पोना. योगेश बारी, विकास सातदीवे, पोका नितीन ठाकूर, नाना तायडे, किरण पाटील, राहुल घेटे यांनी केली आहे.

## शेरीच्या सरपंच अपात्र

**जळगाव । प्रतिनिधी**

धरणगाव तालुक्यातील शेरी येथील ग्रामपंचायत सरपंच विमलबाई देविदास चौधरी यांना विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र साधारण केल्यामुळे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी अपात्र घोषित केले आहे. याबाबतचा निकाल मंगळवारी दि. २५ फेब्रुवारी रोजी त्यांनी दिला आहे. विमलबाई देविदास चौधरी ह्या दि. ५ जून २०२३ रोजी झालेल्या सरपंच पदाच्या निवडणुकीत नागरिकांचा मागास प्रवर्ग या आरक्षित जागेवर निवडून आल्या होत्या.

## पिकअप वाहनाची पानटपरीला धडक; दोन जखमी

**जळगाव । प्रतिनिधी**

शहरातील जुने जळगाव परिसरातील आंबेडकर नगर भागात बुधवारी २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता एका बुलेरो पिकअप वाहनाने पानटपरीला जोरदार धडक दिली. या अपघातात पान टपरीजवळ उभे असलेले एक पुरुष ग्राहक आणि टपरी चालक महिला गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

जळगावच्या जुने जळगाव गाव परिसरातील आंबेडकर नगर भागात रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. या काँक्रिटीकरणाच्या कामावर वापरण्यात येणाऱ्या बुलेरो पिकप गाडीने बुधवारी २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता रस्त्यावरील पान टपरीला जोरदार धडक दिली. या पान टपरीवर उभे असलेल्या ग्राहक पुरुषाला व पानटपरी चालक महिलेला गंभीर दुखापत झाली. ही बुलेरो पिकअप वाहनाने पान टपरीला धडक दिल्यानंतर पुढे असलेल्या विद्युत रोहित्रच्या खांबाला जाऊन धडकली. रस्त्याच्या कामावर वापरण्यात येणाऱ्या या बुलेरो पिकअप वानाने दोन जणांना जखमी केली असून यांच्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहे.

## आरटीएमएस थेरेपीद्वारे ओसीडी रुग्णावर उपचार

**वैद्यकीय**

### डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील मानसोपचार तज्ज्ञांचे यश

**जळगाव । प्रतिनिधी**

डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील मानसिक विकार तज्ज्ञांनी ऑब्सेसिव्ह-कम्पल्सिव्ह डिसऑर्डर असलेल्या ३० वर्षीय रुग्णावर यशस्वी उपचार करून त्याला नवजीवन दिले आहे. अत्याधुनिक आरटीएमएस थेरेपीच्या मदतीने हा उपचार करण्यात आला असून, रुग्णाची स्थिती लक्षणीय सुधारली आहे.

याबाबत माहिती अशी की, जळगावातील ३० वर्षीय सुरेंद्र नामक तरूण एका दुकानात काम करून आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवितो. या तरूणाला मागील अनेक महिन्यांपासून चिडचिड, वारंवार स्वच्छतेची भीती, काम करायला लागणारा जास्त वेळ, तणाव आणि सतत नकारात्मक विचार या समस्या येत होत्या. सुरुवातीला त्याने हा त्रास दुर्लक्षित केला, परंतु नंतर त्याचा दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होऊ लागला. त्यामुळे कुटुंबीयांनी त्याला डॉ. उल्हास पाटील रुग्णालयाच्या मानसिक आरोग्य विभागात आणले. याठिकाणी मानसिक विकार तज्ञ डॉ. विलास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. आदीत्य जैन, डॉ. सौरभ भूतांगे, डॉ. उमा चांदूरकर, डॉ. हिमांशू जाधव यांनी तरूणाची सखोल तपासणी करून त्याला ओसीडी असल्याचे निदान केले. रुग्णाची स्थिती लक्षात घेता मानसोपचार व औषधोपचारासोबतच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उपचार पद्धती वापरण्याचा निर्णय घेण्यात आला. आरटीएमएस थेरेपीद्वारे उपचार तज्ज्ञांनी रुग्णावर रिपेटिटिव्ह ट्रान्सक्रॅनियल मॅग्नेटिक स्टिम्युलेशन थेरेपी वापरण्याचा निर्णय घेतला. हा एक अत्याधुनिक उपचार असून, त्याद्वारे मेंदूतील विशिष्ट भागांना नियंत्रित मॅग्नेटिक सिग्नल पाठवले जातात, ज्यामुळे मानसिक संतुलन सुधारण्यास मदत होते.



**उपचारानंतर सकारात्मक बदल**

थेरेपी आणि मानसोपचारांच्या मदतीने रुग्णाच्या वर्तनामध्ये सकारात्मक बदल दिसू लागला.स्वच्छतेबाबतची भीती कमी झाली. चिडचिड आणि मानसिक तणाव कमी झाला. काम करण्याचा वेग सुधारला आणि आत्मविश्वास वाढला. सततच्या नकारात्मक विचारांवर नियंत्रण मिळवता आले.

## कुसुंबा येथील तरुणाची गळफास घेत आत्महत्या

**जळगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील कुसुंबा येथील एका १९ वर्षीय तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या



केल्याची धक्कादायक घटना बुधवारी संध्याकाळी ५ वाजता उघडकीस आली आहे. कुणाल दत्तात्रय पाटील (वय १९, रा. श्रीराम चौक, कुसूंबा ता. जळगाव) असे मयत तरुणाचे नाव आहे. तो आई, वडील, लहान भाऊ यांचेसह राहत होता. पोलिसांनी माहितीनुसार, कुणाल पाटील हा घरी एकटाच असताना त्याने छताला गळफास लावून घेत आत्महत्या केली. कुटुंबीय संध्याकाळी घरी आले तेव्हा घटना उघड झाली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कुणाल पाटील याला मयत घोषित करताच कुटुंबीयांनी एकच आक्रोश केला.

cmyk